


दैनिक महाराष्ट्राचा बुलंद आवाज • छत्रपती संभाजीनगर • जालना • बीड • परभणी • लातूर • नांदेड • धाराशिव • हिंगोली • अहिल्यानगर

# मराठवाडा पत्र

संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे




•बीड(महाराष्ट्र) •वर्ष ५ वे •अंक १६१ •बुधवार, दि. १० सप्टेंबर २०२५ •RNI-MAHMAR/2021/80074 •Post: Reg.No.L/226/RNP/Renewal/2025-2027 •पान १ •पाने ४ •किंमत ३ रूपये

• dailymarathwadapatra2021@gmail.com • https://marathwadapatra.com • https://epaper.marathwadapatra.com • Mo. 9822152955

# 'फडणवीसांनी त्याला जेलमध्ये टाकायला पाहिजे तो सरकारचा बाप नाही'; छगन भुजबळांच्या पत्रावरून जरांगे पाटील संतापले...




बीड । प्रतिनिधी

सरकारने मराठा समाजाला ओबीसीतून दाखले देण्यासंदर्भात शासन निर्णय जारी केल्यानंतर मंत्री छगन भुजबळ यांनी आपली उपस्थिती दर्शवली तरीही नाराजी कायम आहे .कुणबी आरक्षणाचा जीआर रद्द करण्याविषयी भुजबळांनी मुख्यमंत्र्यांना पत्र दिल्याचं सांगितल्यानंतर दुसरीकडे मराठा आरक्षण आंदोलन मनोज जरांगे यांनी भुजबळ यांना चांगलेच फटकारलंय. 'आठ पानाचे किंवा आठशे पानाचे पत्र देऊ द्या , मुख्यमंत्री त्याला कोलून लावणार, तो सरकारचा बाप नाही. ' असे म्हणत जरांगे भुजबळांवर संतापल्याचं पहायला मिळालं . सरकारने हेराफेरी करायची नाही जर हेराफेरी केली तर सरकारला रस्त्याने फिरू देणार नाही असा इशाराही जरांगे यांनी सरकारला दिला .

### • काय म्हणाले मनोज जरांगे ?

सरकारने हेराफेरी केली तर रस्त्याने फिरू देणार नाही . ज्या अर्थी हे कोर्टात जायला तयार झाले, जीआर बाबत मुख्यमंत्र्यांना पत्र लिहायला लागलेत याचा अर्थ हा जीआर मराठ्यांसाठी खूप महत्त्वाचा आणि चांगला आहे असे जरांगे म्हणाले . कुणबी आरक्षणाच्या जीआर वरून मंत्री छगन भुजबळ यांनी आमंत्र्यांना पत्र लिहीत आपली नाराजी स्पष्ट दाखवली .त्यानंतर मराठा आरक्षण आंदोलन मनोज जरंगे यांनी या पत्रावरून भुजबळांना फटकारलं . ते म्हणाले, 'त्याने आठ पानाचे किंवा आठशे पानाचे पत्र देऊ द्या .मुख्यमंत्री त्याला कोलून लावणार .तो सरकारचा बाप नाही .सरकारने हेराफेरी करायची नाही .जर हेराफेरी केली तर सरकारला रस्त्याने फिरू देणार नाही .राज्य मंत्रिमंडळाच्या उपसमितीने हा जीआर काढला .त्यांना अक्कल नाही आणि तुला अक्कल आहे का ?मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस,शिंदे अजित दादांना यांना अक्कल नाही,तुला एकट्यालाच अक्कल आहे का ? फडणवीस यांनी याला जेलमध्ये टाकायला पाहिजे, हा सरकारचा मालक झाला का ?प्रमाणपत्र वाटायला लगेच सुरुवात करायची नाहीतर पुन्हा म्हणू नका विदारक परिस्थिती झाली म्हणून असा इशाराही मनोज जरांगेंनी सरकारला दिला.

### • मराठा आरक्षणाच्या निर्णयाची अंमलबजावणी करण्याचे निर्देश

**मराठा आरक्षण आंदोलन मनोज जरांगे पाटील यांच्या आंदोलनानंतर सरकारने घेतलेल्या निर्णयांची अंमलबजावणी करण्याचे निर्देश राज्यातील सर्व जिल्हाधिकाऱ्यांना देण्यात आले आहेत .त्यानुसार मराठा समाजातील युवकांना कुणबी दाखले देण्याचा संदर्भात कार्यवाही करण्यासही सुरुवात झाली आहे .**

### • कुणबी आरक्षणाचा जीआर रद्द करा, भुजबळांचे पत्र

मराठा समाजाला ओबीसीतून दाखले देण्यासंदर्भात शासन निर्णय जारी झाल्यानंतर ओबीसी नेते आक्रमक झाले असून मंत्री छगन भुजबळ आपल्याच सरकारवर नाराज आहेत. आजच्या मंत्रिमंडळ

▶▶ उर्वरित पान २ वर

# मराठा समाजाच्या न्याय्य हक्कांसाठी शेवटपर्यंत लढणार; मंत्री माणिकराव कोकाटे यांचे आश्वासन

नाशिक । प्रतिनिधी

मराठा समाजाच्या न्याय्य हक्कासाठी शेवटपर्यंत प्रयत्न राहतील, समाजातील भेदभाव, वेठीस धरण्याच्या प्रवृत्तींना नाकारून शांतता व ऐक्याच्या मार्गाने समाजकल्याण साधण्याची गरज असल्याचे प्रतिपादन मराठा आरक्षण उपसमितीचे सदस्य व राज्याचे क्रिडा व युवक कल्याण मंत्री ॲड. माणिकराव कोकाटे



यांनी केले. श्री कालिका माता मंदिराच्या सभागृहात मराठा समाजाला आरक्षण जाहीर केल्याबद्दल जिल्हा सकल मराठा समाजातर्फे मंत्री कोकाटे यांचा सत्कार झाला. या वेळी ते बोलत होते. ते म्हणाले, मराठा समाजाने लाखोंच्या संख्येने विविध ठिकाणी मोर्चे काढले. उच्च न्यायालयात टिकणारा निर्णय न मिळाल्याने मराठा समाजात

▶▶ उर्वरित पान २ वर

# जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांच्या हस्ते वृक्षारोपण उपक्रमाचे उद्घाटन

बीड । प्रतिनिधी

हरित आणि प्रदूषणमुक्त शहराच्या निर्मितीसाठी बीड जिल्हा प्रशासनाने आज एक महत्त्वपूर्ण पाऊल टाकले. जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांच्या हस्ते वृक्षारोपण उपक्रमाचे औपचारिक उद्धाटन करण्यात आले. या मोहिमेमुळे शहराचा सौंदर्यवृद्धीसोबतच पर्यावरण



संवर्धनालाही बळकटी मिळणार आहे. कार्यक्रमाच्या प्रारंभी जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी स्वतः झाडाचे रोप लावून मोहिमेचा शुभारंभ केला. त्यांनी या निमित्ताने शहरातील प्रमुख रस्त्यांच्या डिव्हायडरवर तसेच राष्ट्रीय महामार्गाच्या दोन्ही बाजूंनी मोठ्या प्रमाणावर वृक्षलागवड करण्याचा

▶▶ उर्वरित पान २ वर

## रोहयोच्या कामाची पाहणी करण्यासाठी आज केंद्राचे पथक बीड जिल्ह्यात

बीड । प्रतिनिधी

रोजगार हमी योजनेअंतर्गत झालेल्या कामांची पाहणी करण्यासाठी उद्या केंद्राचे तीन सदस्यीय पथक बीड जिल्ह्यात येत आहेत. दोन तालुक्यातील चार ग्रामपंचायतींना हे पथक भेट देणार असून गावातील विविध विकास कामांची पाहणी करण्यात येणार जिल्ह्यात गेवराई, बीड, शिरूर, केज तालुक्यातील कामांची पाहणी करण्यात येणार आहे. त्यांच्या समवेत जिल्हा परिषद व पंचायत समितीचे कर्मचारी, अधिकारी सहभागी राहणार आहेत.

बीड जिल्ह्यात वर्षभरात रोहयोची अनेक कामे झालेली आहेत, या कामांची पाहणी करण्यासाठी उद्या केंद्राचे तीन सदस्यीय पथक बीडमध्ये येत आहे. गेवराई, बीड, पाटोदा, शिरूर, केज या तालु३यातील ग्रामपंचायतींना हे पथक भेटी देणार आहे. दोन तालु३यातील चार ग्रामपंचायतींच्या कामांची

▶▶ उर्वरित पान २ वर

# मराठ्यांना कुणबी दाखले देण्यास सुरुवात करावी : मंत्रिमंडळ उपसमितीचे निर्देश

मुंबई । प्रतिनिधी

हैदराबाद गॅझेटसंदर्भात जारी करण्यात आलेल्या शासननिर्णयाची तातडीने अंमलबजावणी सुरु करावी, असे निर्देश मंत्रिमंडळ उपसमितीने राज्यातील विभागीय आयुक्त व जिल्हाधिकाऱ्यांना दिले आहेत. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली मंत्रिमंडळ




उपसमितीने अतिशय विचारपूर्वक निर्णय घेतले आहेत व त्याची अंमलबजावणी सुरू झाली आहे. त्यामुळे शासन निर्णय मागे घेण्याचा कोणताही प्रश्न नाही, असे उपसमितीचे अध्यक्ष व जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे-पाटील यांनी मंगळवारी स्पष्ट केले. राज्यातील सामाजिक ऐक्य कायम रहावे,

▶▶ उर्वरित पान २ वर

## सीपी राधाकृष्णन हे देशाचे नवे उपराष्ट्रपती बनले

नवी दिल्ली । प्रतिनिधी

भाजप एनडीएचे उमेदवार सीपी राधाकृष्णन हे देशाचे नवे उपराष्ट्रपती बनले आहेत. उपराष्ट्रपतीपदासाठी आज झालेल्या निवडणुकीत सीपी राधाकृष्णन विजयी झाल्याने महाराष्ट्राचे माजी राज्यपाल आता देशाचे उपराष्ट्रपती झाले आहेत. माजी उपराष्ट्रपती जगदीश धनकड यांनी प्रकृतीच्या कारणास्तव आपल्या पदाचा राजीनामा दिला होता. त्यामुळे, उपराष्ट्रपदीपदासाठी भाजपकडून



कोणाला संधी मिळणार अशी चर्चा सुरू असतानाच भाजपने नेहमीप्रमाणे नावाचे धक्कातंत्र दिले. सीपी राधाकृष्णन यांना उमेदवारी देत सर्वांनाच आश्चर्याचा धक्का दिला. दुसरीकडे ▶ उर्वरित पान २ वर

## आरक्षणावरुन ओबीसी नेत्यांमध्येच जुंपली, तायवाडे म्हणाले, 'भुजबळ-वडेट्टीवारांनी समाजाची दिशाभूल करु नये'

मुंबई । प्रतिनिधी

मनोज जरांगे पाटील यांच्या नेतृत्त्वाखाली आझाद मैदानावर झालेल्या आंदोलनानंतर राज्य सरकारने मराठा आरक्षणासंदर्भात एक शासन आदेश जारी केला आहे. हैदराबाद गॅझेटमध्ये नोंद असलेल्यांना कुणबी प्रमाणपत्र देण्याबाबतचा जीआर राज्य सरकारने काढला आहे. यामुळे ओबीसी संघटना मात्र सरकारवर नाराज होताना दिसत आहे. राज्याचे अन्न व नागरी पुरवठा मंत्री



व ओबीसींचे नेते छगन भुजबळ यांनी या जीआरला विरोध दर्शवला आहे. त्यांच्या मताशी काँग्रेस विधिमंडळ पक्षाचे नेते विजय वडेट्टीवार यांनी सहमती दर्शवली आहे. तर आता आरक्षणाच्या मुद्द्यावरून ओबीसी नेत्यांमध्येच जुंपल्याचे पाहायला मिळत आहे. छगन भुजबळ व विजय वडेट्टीवार यांनी ▶▶ उर्वरित पान २ वर

## अल्पवयीन मुलीवर दोघांकडून अत्याचार

परळी । प्रतिनिधी

रेल्वेस्थानक परिसरात पाच वर्षाच्या चिमुकलीवर अत्याचार झाल्याच्या घटनेला दहा दिवस उलटत नाही तोच शहरातील बरकतनगर भागातील बारा वर्षीय अल्पवयीन मुलीवर दोघा जणांनी अत्याचार केला आहे. याप्रकरणी आरोपीविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. परळी शहरातील बरकतनगर भागातील बारा वर्षीय अल्पवयीन मुलगी दि. ७ रोजी रात्री नऊच्या दरम्यान दुकानातून किरकोळ साहित्य खरेदी करून घराकडे येत असताना अंधाराचा फायदा



घेत तिला एका ओढ्यामध्ये जबरदस्तीने नेऊन तिच्यावर बरकतनगर ▶▶ उर्वरित पान २ वर




# परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांचा संवेदनशील निर्णय



**मराठा आंदोलनात मृत पावलेल्या बांधवांच्या कुटुंबियांना प्रत्येकी ५ लाखांची मदत ; ही मदत संघर्षयोद्धा मनोज जरांगे पाटील यांच्या हस्ते संबंधित कुटुंबीयांना देण्यात येणार आहे.**

मुंबई । प्रतिनिधी

मराठा आरक्षणासाठी संघर्षयोद्धा मनोज जरांगे पाटील यांच्या नेतृत्वाखाली सुरु असलेल्या आंदोलनासाठी मुंबईकडे प्रयाण करताना तसेच तेथे पोहोचल्यानंतर काही आंदोलक बांधवांचे दुर्दैवी निधन झाले. या हृदयद्रावक घटनेमुळे कुटुंबीयांवर दुःखाचा डोंगर कोसळला आहे. या गोरगरीब कुटुंबियांच्या डोळ्यात आशेचा किरण निर्माण व्हावा आणि त्यांना न्याय व आधार मिळावा यासाठी परिवहन मंत्री तथा धाराशिव जिल्ह्याचे पालकमंत्री मा. प्रताप इंदिराबाई बाबुराव सरनाईक यांनी पुढाकार घेत स्वखर्चातून प्रत्येकी ५ लाख रुपयांची मदत देण्याचा निर्णय घेतला आहे. तरी ही मदत संघर्षयोद्धा मनोज जरांगे पाटील यांच्या हस्ते संबंधित कुटुंबियांना देण्यात येणार आहे. मराठा आंदोलनात दुर्दैवी मृत्यु पावलेले आंदोलक- १) सतीश देशमुख – गाव: वरपगाव, ता. केज, जि. बीड २) विजय चंद्रकांत घोगरे – गाव: टाकळगाव, ता. अहमदपूर, जि. लातूर ३) अतुल कवचट – गाव: केसापुरी, ता. बीड, जि. बीड ४) गोपीनाथ जाधव – गाव: बोराळा, ता. वसमत, जि. हिंगोली ५) भारत यादव खरसाडे – गाव: आहेर वडगाव, ता. बीड, जि. बीड हा निर्णय समाजासाठी संवेदनशीलता व बांधिलकीचे प्रतीक ठरत असून, मृतांच्या कुटुंबीयांना दिलासा देणारा आहे.






# नेपाळमध्ये राजेशाही कशी संपली ?

## राजघराण्याच्या लोकांना गोळ्या कुणी घातल्या? जाणून घ्या Gen Z आंदोलनाच्या आधीचा इतिहास

हिमालयाच्या कुशीत वसलेल्या नेपाळमध्ये (Nepal) सध्या मोठा गोंधळ सुरू असून त्या देशाच्या पंतप्रधानांनी राजीनामा दिला आहे. बालेन शाह हे नेपाळच्या अंतरिम सरकारचे नवे प्रतिनिधी असतील. सध्या लोकशाही मार्गाने या देशात सत्तांतर होत असलं तरी एकेकाळी, जवळपास 250 वर्षे शाह वंशाची (Shah Dynasty) राजेशाही (Monarchy) सुरू होती. एका भयानक नरसंहारामुळे (Royal Massacre) नेपाळच्या राजशाही परंपरेचा पाया हादरला आणि अखेरीस ती संपुष्टात आली.

### शाह वंशाची सुरुवात आणि राणा शासन

1768 मध्ये पृथ्वीनारायण शाह (Prithvi Narayan Shah) यांनी गोरखा सैन्याला एकत्र करुन काठमांडू खोऱ्यातील लहान राज्ये जिंकली आणि आधुनिक नेपाळची पायाभरणी केली. शाह राजा हिंदू धर्माचे संरक्षक आणि विष्णूचे अवतार मानले जात होते. मात्र 1846 मधील कोत पर्व हत्याकांडानंतर (Kot Massacre 1846) जंग बहादूर राणांनी सत्ता हाती घेतली. राणा शासन ((Rana Rule 1846–1951) काळात राजे फक्त नावापुरते होते, प्रत्यक्ष सत्ता पंतप्रधान राणांकडेच होती.

### Constitutional Monarchy In Nepal : भारताची भूमिका आणि घटनात्मक राजेशाही

सन 1950-51 मधील क्रांतीनंतर राजा त्रिभुवन (King Tribhuvan) यांनी भारताच्या मदतीने सत्ता मिळवली. दिल्ली करार (Delhi Agreement 1951) झाल्यानंतर नेपाळमध्ये घटनात्मक राजेशाहीची सुरुवात झाली. पुढे राजा महेंद्र (King Mahendra) यांनी 1960 मध्ये संसद बरखास्त करून पंचायत व्यवस्था (Panchayat System) आणली. 1990 च्या जनआंदोलनानंतर (People's Movement 1990) राजा बीरेन्द्र यांना घटनात्मक राजेशाही मान्य करावी लागली. पण 1996 मध्ये सुरू झालेल्या माओवादी आंदोलनाने (Maoist Insurgency 1996–2006) राजेशाहीविरोधी संघर्षाला अधिक धार आली.




### Nepal Royal Palace Massacre २००१ : राजघराण्याचा नरसंहार

काठमांडूतील नारायणहिटी पॅलेसमध्ये शाही मेजवानी सुरू असतानाच युवराज दीपेंद्र शाह यांनी स्वतःच्या कुटुंबीयांवर गोळ्या झाडल्या. यात राजा बीरेन्द्र, राणी ऐश्वर्या, त्यांची मुले निरंजन आणि श्रुती यांच्यासह 9 सदस्य ठार झाले. नंतर दीपेंद्रने स्वतःवरही गोळी झाडून आत्महत्या केली. या घटनेने राजेशाहीला मोठा धक्का बसला.

### End of Monarchy : जनआंदोलन आणि राजेशाहीचा अंत

दीपेंद्रनंतर ज्ञानेन्द्र राजा झाले, पण त्यांची लोकप्रियता नव्हती. 2005 मध्ये त्यांनी संसदेला बाजूला सारुन प्रत्यक्ष सत्ता हाती घेतली, त्यामुळे लोकांचा संताप वाढला. 2006 मध्ये सात पक्षीय आघाडी आणि माओवादी यांच्यात 12 सूत्री करार झाला. लाखो लोक रस्त्यावर उतरल्याने ज्ञनेन्द्रना संसद पुन्हा सुरू करावी लागली. नंतरच्या शांतता करारानंतर 2007 मध्ये (Nepal (Peace Accord 2006)) अंतरिम संविधान अस्तित्वात आले आणि राजेशाही निलंबित करण्यात आली. एप्रिल 2008 च्या संविधान सभेच्या निवडणुकीत माओवादी बहुमताने विजयी झाले. 28 मे 2008 रोजी संविधान सभेने 240 वर्षांची राजेशाही संपवून नेपाळला संघीय लोकशाही गणराज्य (Federal Democratic Republic of Nepal) घोषित केले. राजेशाही संपल्यानंतर राम बरन यादव (Ram Baran Yadav) हे नेपाळचे पहिले राष्ट्रपती झाले. नारायणहिटी पॅलेसला संग्रहालयात रूपांतरित करण्यात आले. आजही आर्थिक आणि राजकीय संकटाच्या पार्श्वभूमीवर नेपाळमध्ये काहीजणांकडून राजेशाही पुनर्स्थापनेची मागणी होत आहे. असं असलं तरीही देशाने लोकशाही मार्ग कायम ठेवला आहे. लोकशाही मार्गाने निवडून आलेले ओपी शर्मा ओली यांनी पंतप्रधानपदाचा राजीनामा दिला.

◆ पान ४ वरून पुढे...

## शासनाच्या त्रिसूत्रीनुसार...

आशा अभियानाच्या माध्यमातून ग्रामपंचायतींना ही भरघोस निधी मिळत आहे आणि यातून आज ग्रामीण भागातील अनेक गावे समृद्ध बनत आहेत. येणाऱ्या काळात ही शासन स्तरावर अनेक अभियान राबवले जातील यामध्ये प्रत्येक ग्रामपंचायतींनी सहभाग नोंदवत शासनाच्या त्रिसूत्री नुसार काम केले तर आपल्या तालुक्यातील गावे समृद्ध होतील. दरम्यान आता पंचायत समितीमध्ये गावच्या विकासासाठी कुठल्याही गटातटाला येथे स्थान नाही. कुणालाही चांगले काम करताना अडचण येणार नाही, याची मी आमदार म्हणून वैयक्तिक जबाबदारी घेतो. गावच्या प्रगतीच्या वाटचालीत मी सदैव तुमच्या पाठीशी खंबीरपणे उभा राहणार आहे. ते पुढे म्हणाले की, मागील काही काळात पंचायत समितीच्या कामकाजात विस्कळीतपणा दिसून आला होता. मात्र गेल्या दोन वर्षांत आम्ही त्यावर मोठ्या प्रमाणात सुधारणा केल्या आहेत. भैय्यासाहेबांच्या नेतृत्वाखाली पंचायत समितीने एकजुटीने काम सुरू केले असून येत्या काळात बीड जिल्ह्यातच नव्हे तर राज्यात सर्वोत्कृष्ट कामकाज करणारी पंचायत समिती म्हणून गेवराईचे नावलौकिक मिळवू असा विश्वास व्यक्त केला गावाच्या विकासात सरपंचांची भूमिका अधोरेखित करताना गटविकास अधिकारी अनिरुद्ध सानप म्हणाले की, गावचे खरे नेतृत्व सरपंच करतात. शासनाच्या त्रिसूत्रीचा अंगीकार करून प्रत्येक गावात योजनांची अंमलबजावणी झाली, तर गावाचे सर्वांगीण रूपांतर होऊन खऱ्या अर्थाने समृद्ध गाव निर्माण होईल. म्हणून या अभियानात जास्तीत जास्त ग्रामपंचायतींनी आपला सहभाग नोंदवा असे आवाहन बीडीओ सानप यांनी केले. या कार्यशाळेत मोठ्या संख्येने सरपंच, ग्रामसेवक, ग्रामरोजगार सेवक, सर्व अधिकारी कर्मचारी यांनी सहभाग नोंदवला होता. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विस्तार अधिकारी रमेश उनवणे यांनी केले तर उप अभियंता संजीव चोपडे यांनी उपस्थितीतांचे आभार मानले.

## अनिलदादा जगताप...

पुढाकार घेतला आहे. अनिलदादा जगताप फाउंडेशन बीड आणि

◆ पान ४ वरून पुढे...

शिवसेना आयोजित रेंज पाहिजे या नाटकाचे दिग्दर्शन लक्ष्मीकांत दोडके यांनी केले असून या नाटकाचे लेखन सौ. सोनलताई नहार यांनी केले आहे. सहाय्यक दिग्दर्शक म्हणून रोहित पुराणिक तर निर्मिती सूत्रधार प्रतिक कांबळे आहेत. रसिक प्रेक्षकांच्या अंतर्मनाला स्पर्श करणारं आणि तितकंच विनोदी असणारं रेंज पाहिजे नाटक बीडकरांना मनोरंजनाची पर्वणी असणार आहे.

चला, बीडच्या नाट्यपरंपरेला सुवर्णयुगाकडे नेऊ या– अनिलदादा जगताप : बीडमधील तब्बल ७० कलाकारांनी. एकत्रित प्रयत्न, अथक मेहनत आणि कला हीच खरी साधना या भावनेतून त्यांनी रेंज पाहिजे ही अद्भुत कलाकृती रंगभूमीवर आणली आहे. ही कलाकृती केवळ नाटक नाही तर बीडच्या खंड पडलेल्या नाट्यचळवळीला मिळालेली संजीवनी आहे. आता या नाट्यज्योतीला तेजस्वी करण्याची जबाबदारी सुजाण रसिक श्रोत्यांची आहे. कलाकारांनी आपलं कर्तव्य पार पाडलं आहे. आता प्रेक्षकांनी आपली साथ, आपले टाळ्यांचे दान, आपली उपस्थिती देऊन या नवचैतन्याला खऱ्या अर्थाने अर्थपूर्ण करावं. कारण नाटक हे कलाकार व प्रेक्षक यांच्यातील जिवंत नातं आहे. तेव्हा चला, आपण सारे या नाट्ययज्ञात सहभागी होऊ या आणि बीडच्या नाट्यपरंपरेला पुन्हा एकदा सुवर्णयुगाकडे नेऊ या. असे आवाहन शिवसेना जिल्हाप्रमुख अनिलदादा जगताप यांनी केले आहे.

## मराठा समाजाचा...

आणखीही म्हणावा तेवढा सामाजिक पटलावर तो समाज आलेला नाही. दिवसेंदिवस वाढत जाणाऱ्या लोकसंख्येमुळे आहे त्या आरक्षणामध्येच न्याय मिळताना दिसत नाही. मात्र तरीही आम्हाला ओबीसी मधूनच आरक्षण पाहिजे असा हट्ट करत मागच्या दोन वर्षांपासून ओबीसी समाजामध्ये भीतीचे वातावरण निर्माण करण्यात आले आहे. आंदोलन असो वा दबाव असो अशा काही गोष्टींना बळी पडून ओबीसी समाजाला जाचक असे काही सरकारने निर्णय घेतलेले आहेत. मात्र तरीही शांत असलेल्या ओबीसी समाजावर प्रचंड अन्याय होईल असा दोन सप्टेंबर ला एक जीआर काढण्यात आला आणि त्यामध्ये शब्दांचा खेळ करून

◆ पान ४ वरून पुढे...

केवळ प्रतिज्ञापत्रावर सुद्धा कुणबी प्रमाणपत्र काढता येईल असे काही मुद्दे घालण्यात आले. त्यामुळे ओबीसी समाजामध्ये प्रचंड असंतोष निर्माण झाला असून एवढे दिवस शांत असलेला ओबीसी समाजाचा खडबडून जागा झाला आहे. आणि आता मात्र संघर्ष करावा लागतो हे त्यांच्याही लक्षात आलेले आहे आणि म्हणून जीआर काढला त्याच्या दुसऱ्या दिवसापासून संपूर्ण महाराष्ट्रामध्ये आणि विशेषत: मराठवाड्यामध्ये ठिकठिकाणी आंदोलने, निदर्शने, मेळावे होऊ लागलेले आहेत. आणि त्याच अनुषंगाने केज येथेही समता परिषदेचे विभागीय अध्यक्ष ॲड. सुभाष राऊत यांच्या मार्गदर्शनाखाली रॅली काढून आणि प्रचंड घोषणाबाजी करत ओबीसी बांधव तहसीलवर धडकले आणि केजचे तहसीलदार यांना एक निवेदन देण्यात आले. आणि यामध्ये मराठा समाजाचा ओबीसी मध्ये समावेश करू नये असा अशी प्रमुख मागणी करण्यात आली. यावेळी तालुक्यातील समता परिषदेचे तालुकाध्यक्ष सचिन राऊत, नाभिक संघटनेचे नवनाथ टोपे, दलित चळवळीचे चंद्रकांत खरात, उपसरपंच श्री.चौरे, कुंभार संघटनेचे श्री.कुंभार, सचिन रोडे राम मेजर राऊत, सरपंच आशोक राऊत, कपिल राऊत, रावसाहेब दादा राऊत, कटारे मामा यांच्यासह ओबीसी बांधव मोठ्या प्रमाणावर सहभागी झाले होते.

## महाराष्ट्र जनसुरक्षा...

सकाळी ११.३० वाजता भव्य आंदोलन व निदर्शन करण्यात येणार आहे. करीता सदरील जनसुरक्षा कायद्या विरोधात काढण्यात येणाऱ्या भव्य आंदोलन व निदर्शना मध्ये सर्व आजी माजी खासदार, आमदार, प्रदेश पदाधिकारी, सर्व सेलचे अध्यक्ष, कार्याध्यक्ष, सर्व विधानसभा अध्यक्ष, कार्याध्यक्ष, सर्व आजी माजी नगरसेवक, पदाधिकारी, वॉर्ड अध्यक्ष, बुथ अध्यक्ष, मान्यवर व ईतर सर्व आजी /माजी पदाधिकारी यांनी न चुकता उपस्थित राहावे., असे आवाहन बीड जिल्हाध्यक्ष श्री राजेंद्र मस्के यांनी केले आहे.

## तालुकास्तरीय कबड्डी...

भुंबे सर, शिल्पे सर, राठोड सर, कवडे सर, बोचरे सर, सरवदे सर, राऊत

◆ पान ४ वरून पुढे...

सर, बोबडे सर, मेंडके सर, भदर्गे सर, मुळे सर कटारे सर व करडकर सर यांची उपस्थिती होती यावेळी शाळेचे मुख्याध्यापक सर्व शिक्षक वृंद विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## बीड शहर ....

नियोजन करण्यात यावे आदरणीय कोर्ट इमारतीच्या समोर व जिल्हाधिकारी कार्यालयाच्या समोर यू'टर्न देण्यात यावेत. शहरातील नियमित सफाई व कचरा व्यवस्थापनासाठी कमीत कमी नव्या ४ ते ५ जे.सी.बी. मशीन्स व ५० घंटा गाड्यांची तात्काळ गरज आहे तरी शासनाने त्या उपलब्ध करून द्याव्यात. नियमित सफाई मोहीम चालू ठेवण्यात यावी. शहरात सर्व भागांमध्ये रोग प्रतिबंधात्मक औषध फवारणी तात्काळ करण्यात यावी व नियमित चालू ठेवावी. मोकाट जनावरांचा तात्काळ बंदोबस्त करण्यात यावा. शहरातील सर्व भागातील पथदिवे तात्काळ वाढवण्यात यावेत. याचा अहवाल नुकताच काही दिवसांपूर्वी नगरपालिकेला दिलेला आहे. नगरपालिकेने दिलेल्या दिनांक १४/८/२०२५ रोजीच्या पत्रानुसार पत्र क्रमांक आवक जावक क्रमांक ३२९९ नुसार धानोरा रोड भागातील खड्डे मुरूम टाकून तात्काळ बुजवण्यात येणार होते. तरी अद्यापही खड्डे बुजवण्यात आलेले नाहीत. तरी अंकुश नगर व धानोरा रोड परिसरातील रस्त्यावरील सर्व खड्डे तात्काळ बुजवण्यात यावेत. शहरातील अनेक भागांमध्ये रस्त्याची दुरावस्था झालेली आहे तरी सर्वच भागातील रस्त्यांवरील खड्डे मुरूम टाकून तात्काळ बुजवण्यात यावेत. जिल्हाधिकारी साहेब, एस पी साहेब मुख्याधिकारी साहेब यांना निवेदन देण्यासाठी बीड शहर बचाव मंच, एस डि पी आय. पार्टी व कम्युनिस्ट पार्टीच्या वतीने, कॉम्रेड प्राचार्य डी जी. तांदळे सर, कॉम्रेड नितीन जायभाये, कॉम्रेड भाऊराव प्रभाळे, ड.अनिल बारगजे, ड.नितीन वाघमारे, बाजीराव ढाकणे, मा.न से. सय्यद फारूक, एस डी पी आय. पार्टीच्या वतीने शेख अब्दुल कादर महासचिव सोशल डेमोक्रेटिक पार्टी ऑफ इंडिया बीड जिल्हा, कलीम ईनामदार जि.समिति सदस्य, एजास चौधरी ज़ि.समिति सदस्य, काज़ीतक़ीउद्दीन, आदिल भाई आदींसह पदाधिकारी उपस्थित होते.

◆ पान ९ वरून पुढे...

## 'फडणवीसांनी त्याला...

बैठकीला त्यांनी आपली उपस्थिती दाखवली खरी पण नाराजी कायम आहे .सरकारकडून मराठवाड्याच्या आठ जिल्ह्यातील नोंदी शोधण्याबाबत सांगितलं जात आहे .मराठा आरक्षणासाठी जो जीआर काढण्यात आलाय तो दबावाखाली काढण्यात आला आहे .सरकारने ओबीसी समाजाची जी समिती निर्माण केली त्याबाबत देखील कोणतीही चर्चा नाही .जीआर काढण्यापूर्वी हरकती सूचना घेणे अपेक्षित होतं मात्र ते देखील झालेलं नाही .असे अनेक मुद्दे मंत्री छगन भुजबळ यांनी पत्रात नमूद केल्याचे पत्रकार परिषदेत सांगितलं .

## मराठा समाजाच्या...

अस्थिरता निर्माण झाली. मराठवाड्यात हा प्रश्न अधिक गंभीर असून, आरक्षण लढ्याचे नेतृत्व करणारे मनोज जरांगे यांचे संकल्प आणि संघर्ष महाराष्ट्रभर मराठ्यांच्या पाठिंब्यावर ठाम उभे राहिले. जरांगे-पाटील यांनी कायद्याचे पालन करून आरक्षणासाठी आंदोलन केले, तरीही काही मंडळी राजकारण करीत आहेत. मराठा समाज इतर समाजावर अन्याय करत नाही, त्यामुळे अनावश्यक राजकारण थांबवावे. असे आवाहन त्यांनी केले. मराठा क्रांती मोर्चाचे राज्य समन्वयक करण गायकर व समाजातर्फे नानासाहेब पांगरकर, माजी नगरसेवक व कालिका मंदिर ट्रस्टचे अध्यक्ष केशव पाटील यांनी या वेळी मनोगत व्यक्त केले. नितीन सुगंधी यांनी सूत्रसंचालन केले. प्रफुल्ल वाघ यांनी आभार मानले. या वेळी शिवाजी मोरे, विठ्ठलराजे उगले, आशिष हिरे, व्यंकटेश मोरे, योगेश कापसे, प्रवीण पाटील, दीपक भदाणे, राजेंद्र निंबाळते, भारत पिंगळे, नवनाथ तांबे, डॉ. उल्हास बोरसे, सुनील गायकवाड, योगेश गांगुर्डे, रामभाऊ जगताप, शिवाजी हांडोरे, नाना शिंदे, सुदाम खालकर, बाजीराव कमानकर, मनोज ठाकरे, दादासाहेब जोगदंड, संगीता सूर्यवंशी, सविता वाघ, विकी गायधनी, नितीन काळे, हार्दिक निगळ, विष्णुपंत म्हैसधुणे, सचिन पिंगळे, योगिता आहेर, बाळासाहेब जाधव, दिनकर कांडेकर आदी उपस्थित होते. मराठा क्रांती मोर्चा समन्वयक बंटी भागवत यांनी जिल्ह्यातील मराठा समाजाच्या पाच प्रमुख मागण्या मांडल्या. समाजाच्या प्रमुख मागण्या समाजकल्याण विभागाने समस्या तत्काळ सोडवाव्यात जिल्ह्यातील मराठा संघटनांची नियमित बैठक

◆ पान ९ वरून पुढे...

घ्यावी. सारथी व कै. अण्णासाहेब पाटील आर्थिक विकास महामंडळाने शिबिरे घ्यावी मराठा समाजाचे वसतिगृह पूर्ण करावे, मराठा भवनासाठी प्रयत्न करावे

## जिल्हाधिकारी विवेक...

संकल्प व्यक्त केला. या उपक्रमाअंतर्गत शहराच्या मुख्य रस्त्यांवर व महामार्गालगत हजारो झाडे लावली जाणार आहेत. या वृक्षांमुळे केवळ हिरवळ निर्माण होणार नाही, तर हवेतील प्रदूषण कमी होणे, उन्हाळ्यातील उष्णता नियंत्रित राहणे, नागरिकांना शुद्ध हवा मिळणे आणि जैवविविधतेत वाढ होणे अशा अनेक स्तरांवर लाभ होणार आहेत. आपल्या मनोगतात जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन म्हणाले, वृक्षलागवड ही केवळ एका दिवसापुरती मर्यादित नसून, ती सातत्याने राबविण्याची गरज आहे. प्रत्येक नागरिकाने किमान एक झाड लावून त्याचे संगोपन करण्याची जबाबदारी स्विकारली, तर हरित बीडचे स्वप्न नक्कीच साकार होईल. या कार्यक्रमास राष्ट्रीय महामार्गाचे उपविभागीय अभियंता श्री. राजेंद्र भोपळे, नगरपालिका सहआयुक्त श्री. संभाजी वाघमारे, नगर परिषद मुख्याधिकारी श्री. शैलेश फडसे तसेच जिल्हा प्रशासनातील अधिकारी-कर्मचारी आणि श्री. योगेश क्षीरसागर यांची देखील उपस्थिती होती. तसेच स्थानिक नागरिकांचा उत्स्फूर्त सहभाग होता. पुढील काही महिन्यांत संपूर्ण शहरात ही वृक्षलागवड मोहीम राबविण्यात येणार असल्याचे प्रशासनाने जाहीर केले आहे.

## रोहयोच्या कामाची...

पाहणी करण्यात येणार आहे. या पथकामध्ये भारत सरकारचे उपसचिव आशिष गुप्ता, प्रकल्प अधिकारी किरण माळी, मनोज मिश्रा या तीन अधिकाऱ्यांचा समावेश आहे.

## मराठ्यांना कुणबी...

यासाठी फडणवीस यांच्या भूमिकेनुसार उपसमिती काम करीत असून मंत्री छगन भुजबळ यांची भेट घेवून गैरसमज दूर केले जातील. यासंदर्भात कोणताही दुराग्रह नसून उपसमितीने चर्चेची दारे खुली ठेवली आहेत, असे विखे-पाटील यांनी स्पष्ट केले. मराठा समाजाचे नेते मनोज जरांगे यांच्या

◆ पान ९ वरून पुढे...

उपोषण आंदोलनामुळे हैदराबाद गॅझेट स्वीकारून मराठा समाजातील नागरिकांना कुणबी दाखले देण्याबाबत शासननिर्णय जारी करण्यात आला होता. तो रद्द करावा, अशी मागणी भुजबळ यांनी मुख्यमंत्री फडणवीस यांच्याकडे पत्राद्वारे केली आहे. या शासननिर्णयावरुन ओबीसी समाज संतप्त आहे. या पार्श्वभूमीवर तो शासननिर्णय आणि जरांगे यांना दिलेल्या आश्वासनांची पूर्तता कशी करावी, यासंदर्भात उपसमितीची मंगळवारी बैठक झाली.

## सीपी राधाकृष्णन...

महाविकास आघाडीने बी. सुदर्शन रेड्डी यांना उमेदवारी दिली होती. अखेर, आज झालेल्या मतदानानंतर राधाकृष्णन यांना विजयी घोषित करण्यात आलं आहे. एनडीए आघाडी आणि इंडिया आघाडीमध्ये झालेल्या उपराष्ट्रपती पदाच्या निवडणुकीत इंडिया आघाडीचे खासदार फुटल्याचे निकालानंतर समोर आलं आहे. कारण, भाजप उमेदवार राधाकृष्णन यांना अपेक्षेपेक्षा जास्त मतदान मिळालं आहे. सी.पी. राधाकृष्णन उपराष्ट्रपतीपदाच्या निवडणुकीत विजयी झाले असून त्यांना ७५२ वैध मतांपैकी ४५२ पहिल्या पसंतीची मतं मिळाली आहेत. त्यामुळे, ७५२ वैध मतांपैकी ४५२ पहिल्या पसंतीच्या मतांनी त्यांचा विजय झाला असून बी. सुदर्शन रेड्डी यांना ३०० मतं पडली आहेत. या निवडणुकीत १५ मतं बाद झाली. दरम्यान, उपराष्ट्रपती निवडणुकीसाठी निवड मंडळात ७८२ सदस्य असतात, त्यापैकी ५४३ लोकसभेचे आणि २३९ राज्यसभेचे असतात. सीपी राधाकृष्णन यांची झारखंडनंतर महाराष्ट्राचे राज्यपाल म्हणून नियुक्ती करण्यात आली होती. माजी राज्यपाल रमेश बैस यांच्याजागी राधाकृष्णन यांची नियुक्ती करण्यात आली होती. याआधी ते झारखंडचे राज्यपाल होते. दरम्यान, राज्यात विधानसभा निवडणुकांची तयारी सुरु असताना राधाकृष्णन यांची राज्यपाल म्हणून नियुक्ती करण्यात आली होती. तर, महाराष्ट्रातून ते आता थेट दिल्लीच्या उपराष्ट्रपतीपदी विराजमान झाले आहेत.

## आरक्षणावरुन ओबीसी...

ओबीसी समाजाची दिशाभूल करणे थांबवावे, असे आवाहन राष्ट्रीय ओबीसी महासंघाचे राष्ट्रीय अध्यक्ष बबनराव तायवाडे यांनी केली आहे.

◆ पान ९ वरून पुढे...

नवीन शासन आदेशाला घेवून छगन भुजबळ व विजय वडेट्टीवार यांना काही आक्षेप असेल तर पुरावे सादर करावे, पुरावे सादर न करता आक्षेप घेणे हा ओबीसी समाजाची दिशाभूल करणारा प्रकार असल्याचेही बबनराव तायवाडे म्हणाले आहेत.

१२ मागण्यांबाबत जीआर निघेल अशी अपेक्षा– नवीन शासन आदेशात पात्र शब्द वगळण्याने कोणताही फरक पडला नाही, जी जुनी प्रचलित पद्धत आहे त्याचनुसार वैयक्तिक नोंदीच्या आधारावर जात प्रमाणपत्र वितरित होईल, आजची राज्य शासनासोबत आमची महत्वपूर्ण बैठक होत आहे. त्यात ज्या १२ मागण्या मान्य झाल्या त्याचा जीआर निघेल, अशी अपेक्षा असल्याचे देखील बबनराव तायवाडे यांनी म्हटले आहे.

राज्य सरकारच्या ओबीसी विभागाची आज महत्त्वाची बैठक – दरम्यान, आज सायंकाळी ४ वाजता सह्याद्री अतिथीगृहात राज्य सरकारच्या ओबीसी विभागाची महत्त्वाची बैठक होणार आहे. मंत्री अतुल सावे यांनी ही बैठक बोलावली असून, परिणय फुके आणि बबनराव तायवाडे उपस्थित राहणार आहेत. राष्ट्रीय ओबीसी महासंघ यामध्ये सहभागी होणार आहे. ओबीसींच्या आरक्षणासह इतर मुद्द्यांवर चर्चा होणार आहे. छगन भुजबळ या बैठकीला उपस्थित राहणार का? याकडे आता सर्वांचं लक्ष लागलं आहे.

## अल्पवयीन मुलीवर...

भागातील महेफूज कुरेशी व रेहान सय्यद या दोघांनी अत्याचार केला. या प्रकरणी पिडितेच्या आईच्या फिर्यादीवरून संभाजीनगर पोलीस ठाण्यात कलम ६४ (१), ६५ (१), ७० (२) ३ (५), बी.एन.एस.सह कलम ४/६ /८/१२ पोक्सो ॲक्ट २०२१२ नुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणाचा अधिक तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक जाधवर हे करत आहेत. दहा दिवसातील काळातील ही दुसरी घटना आहे. शहरातील अल्पवयीन मुली व महिला सुरक्षित नसून पोलिसांनी शहरातील शाळा, महाविद्यालय, खासगी शिकवणी असलेल्या भागात गस्त वाढवून टवाळकी करणाऱ्या युवकांना धडा शिकवण्याची मागणी पालकवर्गातून केली जात आहे.

Daily Marathwada Patra Owner, Printer, published and Editor Dattatray Sakharam Narnale has Printed in Gugladevi, Printers Subhash Road, Malives, Kabad Galli, Beed ( Rural) City, Beed Beed 431122 (Maharashtra). Office of Dainik Marathwada Patra Subhash road, Malives, Kabad Galli, Beed Tq- Beed Dist- Beed pin 431122 (Maharashtra) Mo. 9822152955, E-mail- dailymarathwadapatra2021@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com

हे पत्र प्रकाशक मुद्रक व मालक दत्तात्रय सखाराम नरनाळे यांनी गुगळादेवी प्रिंटर्स, सुभाष रोड, माळीवेस, कबाड गल्ली, बीड, ता.जि. बीड – ४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक मराठवाडा पत्र सुभाष रोड, माळीवेस, कबाडगल्ली, बीड ता. जि. बीड – ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. मोबा. ९८२२१५२९५५ संपादक – दत्तात्रय सखाराम नरनाळे, E-mail-marathwadapatra@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com

दैनिक मराठवाडा पत्र
महाराष्ट्राचा बुलंद आवाज
● छत्रपती संभाजीनगर ● जालना ● बीड ● परभणी ● लातूर ● नांदेड ● धाराशिव ● हिंगोली ● अहिल्यानगर
● संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे ● जिल्हा विशेष ● बुधवार, दि. १० सप्टेंबर २०२५ ● पान ४

# शासनाच्या त्रिसूत्रीनुसार काम झाले तर प्रत्येक गाव समृद्ध बनेल : आ. विजयसिंह पंडित

## पंचायत समिती कार्यालयाच्या वतीने गेवराईत मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियानाबाबत कार्यशाळा संपन्न

**गेवराई । प्रतिनिधी**

महाराष्ट्र शासनाच्या वतीने १७ ते २१ सप्टेंबर मध्ये मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियान राबविण्याची घोषणा करण्यात आली असून या अभियानांतर्गत उत्कृष्ट कार्य करणाऱ्या ग्रामपंचायत, पंचायत समिती तसेच जिल्हा परिषदांची निवड करून त्यांना तालुका, जिल्हा, महसुल विभाग व राज्य स्तरावरील प्रोत्साहनपर पुरस्काराने गौरविण्यात येणार असून शासनाच्या त्रिसूत्रीनुसार काम केले तर हे आपले प्रत्येक गाव समृध्द बनेल असे प्रतिपादन गेवराई विधानसभा मतदार संघाचे आमदार विजयसिंह पंडित यांनी केले.

राज्य शासनाच्या वतीने दिनांक १७ सप्टेंबर ते २१ डिसेंबर या कालावधीत मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियान राबवण्यात येणार असून यानिमित्ताने तालुकास्तरीय कार्यशाळांचे आयोजन करण्यात आले होते. या पार्श्वभूमीवर गेवराई येथे तालुकास्तरीय कार्यशाळेचे उद्घाटन गेवराई विधानसभा मतदारसंघाचे आमदार आ. विजयसिंह पंडित यांच्या हस्ते संपन्न झाले. या कार्यक्रम प्रसंगी



ते बोलत होते. कार्यक्रमाला गटविकास अधिकारी अनिरुद्ध सानप, अभियंता संजीव चोपडे, अतिरिक्त गटविकास अधिकारी डोंगरे, गटशिक्षणाधिकारी शिंदे, सरपंच संघटनेचे अध्यक्ष कालिदास नवले, सिरसदेवीचे सरपंच रवींद्र गाडे यांच्यासह आदींची प्रमुख उपस्थिती होती.

या वेळी पुढे बोलताना आ. विजयसिंह पंडित म्हणाले की, ग्राम विकास, स्वच्छता, हरितीकरण, स्वयंपूर्णता व आदर्श ग्रामनिर्मिती या उद्दिष्टांच्या पूर्ततेसाठी हे अभियान एक महत्वपूर्ण पाऊल ठरणार असून प्रत्येक ग्रामपंचायतीने ही संधी साधून आपल्या गावाला समृद्ध गाव करण्यासाठी प्रयत्न करण्याची गरज आहे. गावातील प्रत्येक योजना, प्रत्येक उपक्रम हा विकासाशी थेट जोडलेला असावा.

▶ उर्वरित पान २ वर



गट सचिवांच्या उपोषण नाला भाजपाचे जिल्ह्याचे उपाध्यक्ष नवनाथ अण्णा शिराळे पाटील यांनी भेट देऊन गट सचिवांच्या भावना समजावून घेऊन आदरणीय पंकजाताई मुंडे साहेब यांना आपले निवेदन व या प्रश्न संदर्भात लक्ष घालण्याची विनंती करण्याची आश्वासन दिलेले आहे यावेळी सेवा सोसायटीचे संचालक पिंगळे पाटील नितीन दिवे व सर्व गट सचिव कर्मचारी यावेळी दिसत आहेत.

## अनिलदादा जगताप फाउंडेशनचा पुढाकार; बीडमध्ये 'रेंज पाहिजे' नाटकाचा पहिला प्रयोग 11 सप्टेंबरला

### रसिक प्रेक्षकांनी मोठ्या संख्येने नाट्यप्रयोग पाहण्यासाठी यावं: अनिलदादा जगताप

**बीड । प्रतिनिधी**

अनेक वर्षांच्या प्रदीर्घ कालखंडानंतर बीडच्या रंगभूमीवर नवचैतन्याचा श्वास घेणाऱ्या 'रेंज पाहिजे' या दोन नाटकाची निर्मिती करण्यात आली असून सामाजिक क्षेत्रात कार्यरत असणाऱ्या अनिल दादा जगताप फाउंडेशनने पुन्हा एकदा बीड कलाकारांना मदतीचा हात देऊन बीड रंगभूमीवर नाट्यदीप प्रज्वलीत केला आहे. गुरुवार दि. ११ सप्टेंबर २०२५ रोजी सायं ६.०० वाजता यशवंतराव चव्हाण




नाट्यगृह बीड येथे शहरातील सत्तर कलाकारांचा सहभाग असणाऱ्या रेंज पाहिजे या नाटकाचा पाहिला प्रयोग सादर होणार आहे. शिवसेना जिल्हाप्रमुख अनिलदादा जगताप यांचा संस्कृतक उपक्रमात सक्रिय सहभाग असतोच. मात्र हे संस्कृतीक क्षेत्र प्रगत व्हावं यासाठी कलाकार तयार होणे गरजेचे आहे आणि कलाकार तयार करण्यासाठी कलाकारांना आधार द्यावा लागेल याकरिता अनिलदादा जगताप यांनी

▶ उर्वरित पान २ वर

# मराठा समाजाचा ओबीसींमध्ये समावेश अन्यायकारक : ॲड.सुभाष राऊत

### केजमध्ये रॅली काढून दिले निवेदन

**केज । प्रतिनिधी**

मागच्या पिढ्यान पिढ्या ओबीसी प्रवर्गामध्ये जगत असलेला सर्वसामान्य समाज आजही मुख्य प्रवाहामध्ये आलेला नाही. दिवसेंदिवस ओबीसी प्रवर्गामध्ये वेगवेगळ्या जाती समाविष्ट होऊन सुमारे साडेतीनशे जाती ओबीसी प्रवर्गात सामील झाल्या आहेत.मात्र याला प्रचंड विरोध होत असून ओबीसी सम



ाज खडबडून जागा होत मोर्चे, आंदोलने आणि निवेदन देत आहे. मराठ्यांना सरसकट ओबीसीतून आरक्षण देण्याची मागणी जोर धरू लागल्याने सरकार आंदोलन व दबावाला बळी पडून ओबीसी समाजावर अन्याय होईल असे निर्णय घेत आहे. आणि नुकताच एक जीआर काढून अगदी शपथपत्रावरही जातीचे प्रमाणपत्र द्या असे त्यात नमूद केले असल्याने ओबीसी समाज अस्थिर झाला असून त्यांच्यावर अन्याय करण्यात आलेला आहे. मागच्या कित्येक पिढ्यांपासून ओबीसी प्रवर्गामध्ये असणाऱ्या जाती मोल मजुरी करून पोट भरत आलेल्या आहेत.

▶ उर्वरित पान २ वर

## महाराष्ट्र जनसुरक्षा विधेयक २०२४ हे घटनाविरोधी आणि लोकशाहीस बाधक: राजेंद्र मस्के

**बीड । प्रतिनिधी**

महाराष्ट्र जनसुरक्षा विधेयक २०२४ हे घटनाविरोधी आणि लोकशाहीस बाधक विधेयक असून, जनतेच्या मुलभूत हक्कांवर गदा आणणारे आहे. सध्याच्या सरकारने हे जनसुरक्षा विधेयक सामाजिक चळवळीतील कार्यकर्त्यांची मुस्कटदाबी व हुकूमशाही व्यवस्था मजबूत करण्यासाठी आणले आहे. सरकार या कायद्याचा उपयोग विरोधक, डाव्या संघटना आणि डाव्या संघटनांशी संबंधीत लोकांना, सरकारच्या विरोधात बोलणा-या सामान्य नागरीकांना तसेच पक्षाच्या सामान्य कार्यकर्त्यांना अटक करुन दडपशाही आणि बळाचा वापर करुन त्यांच्यावर कार्यवाही करण्यात येईल अशी भीती विविध संघटना आणि विरोधकांनी व्यक्त केली असून कार्यकर्ते व सामान्य नागरीकांमध्ये या विधेयका विरोधात प्रचंड तिव्र असंतोष व भितीचे वातावरण निर्माण झाले आहे, करीता सदरील जनसुरक्षा कायद्या विरोधात दिनांक १० स्पटेंबर २०२५, बुधवार रोजी राज्यभर आंदोलन घेण्याचे निश्चित करण्यात आलेले असून राष्ट्रवादी कॉंग्रेस शरदचंद्र पवार पक्ष बीड व महाविकास आघाडी तर्फे दिनांक १० स्पटेंबर २०२५ बुधवार रोजी बीड शहरातील छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्याजवळ

▶ उर्वरित पान २ वर

## तालुकास्तरीय कबड्डी स्पर्धेमध्ये हारकी निमगाव जि.प.प्रा.शाळा मुलीचा संघ उपविजेता

**माजलगाव । प्रतिनिधी**

येथे तालुकास्तरीय क्रीडा स्पर्धा २०२५ -२६ या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते या स्पर्धेमध्ये विविध शाळांचा सहभाग होता,दिनांक ९/ ९/२०२५ रोजी जिल्हा परिषद प्राथमिक शाळा हारकी निमगाव येथील मुलींचा संघाने सहभाग नोंदवला होता या स्पर्धेमध्ये मुलींच्या संघाने सांघिक कामगिरी करत अंतिम सामन्यांमध्ये चांगला खेळ करत उपविजेता पदाला गवसनी घातली या संघीक कामगिरीचे सर्व स्तरातून कौतुक होत आहे हारकी निमगाव




शाळेमध्ये या सर्व सहभागी खेळाडूंचे शाळेचे मुख्याध्यापक पी.जी देशपांडे सर व सर्व शिक्षक वृंद यांच्या वतीने शाळेमध्ये भव्य सत्कार करून त्यांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

विद्यार्थ्यांना विशेष मार्गदर्शन शाळेचे मुख्याध्यापक पी.जी. देशपांडे सर,राठोड सर,भदरगे सर,कटारे सर,मुळे सर यांनी विशेष मार्गदर्शन केले.या कार्यक्रमाला उपस्थित शाळेचे मुख्याध्यापक पी.जी देशपांडे सर,वंजारे मॅडम,

▶ उर्वरित पान २ वर



माजलगाव लोकनेते सुंदररावजी सोळंके सहकारी साखर कारखाना लि सुंदरनगर...मार्गदर्शक मा.धैर्यशील काका सोळंके यांना वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा देताना कारखाना सचिव सुरेश लगड, मार्केटिंग मॅनेजर विष्णूपंत साबळे,अशोक पाटील,भारतराव शेळके

### बीड शहर बचाव मंच व एसडीपीआय पार्टी चे जिल्हाधिकारी, एस पी साहेब, न.प मुख्याधिकारी यांना तातडीचे निवेदन

# १७ सप्टेंबर पर्यंत शहरातील तातडीची कामे, तात्काळ करण्यात यावीत

**बीड । प्रतिनिधी**

बीड शहर बचाव मंच व एस डी पी आय पार्टी, कम्युनिस्ट पार्टी च्या वतीने येत्या १७ सप्टेंबर २०२५ मराठवाडा मुक्ती संग्राम दिनाच्या पार्श्वभूमीवर बीड शहरातील तातडीची कामे तात्काळ उरकवून घ्यावीत यासाठी जिल्हाधिकारी साहेब, एस पी साहेब व मुख्याधिकारी नगरपरिषद या तिघांनाही निवेदने देण्यात आली. १७ सप्टेंबर पर्यंत शहरातील तातडीची कामे तात्काळ करण्यात यावीत अशी आग्रही विनंती करण्यात आलेली आहे. ही सर्व कामे प्राधान्याने चालू आहेत व लवकरच पूर्ण करण्यात येतील असे प्रशासनाच्या वतीने आश्वस्त करण्यात आलेले आहे. बीड शहरातील रस्ते, नाल्या पथदिवे, कचरा व नालेसफाई, बंद घंटागाड्या, वाहतूक व्यवस्था या सर्व समस्यांमुळे बीड शहराची परिस्थिती अतिशय दयनीय व हलाखीची झालेली आहे. शहरातील सर्व भागातील सर्व स्तरातील नागरीक अतिशय त्रस्त झालेले आहेत. नागरिकांच्या समस्यांना व सहनशक्तीला काही सीमा-मर्यादाच राहिलेली नाही. प्रचंड हाल अपेष्टा नागरिक सहन करत आहेत. या अनुषंगाने जिल्हाधिकारी साहेब, एस. पी. साहेब व मुख्याधिकारी नगरपरिषद यांना या मागण्यांचे निवेदन देण्यात आलेले आहे.

शहरांमध्ये सर्व रस्त्यांवर पार्किंग-मार्किंग पांढऱ्या पट्ट्या तसेच ट्रॅक मार्किंग पांढऱ्या पट्ट्या तात्काळ मारण्यात याव्यात. ठिकठिकाणी आवश्यकतेनुसार पार्किंग व नो पार्किंगचे बोर्ड कायमस्वरूपी लावण्यात यावेत. सर्व जुन्या नव्या अधिकृत रिक्षा थांब्यांवर अधिकृत पार्किंगचे तसेच वाहन संख्या मर्यादेचे बोर्ड लावण्यात यावेत. शहरातून जाणारे सर्व मुख्य हायवे व अंतर्गत रस्ते यावर आवश्यकतेप्रमाणे तसेच दुभाजक व्यवस्थेच्या नुसार तात्काळ सिग्नल लावण्यात यावेत व चालू करण्यात यावेत. शहरांमध्ये रोज फिरणारे नियमित अतिक्रमण पथक तसेच नो पार्किंग पथक चालू ठेवण्यात यावे. मोकाट जनावरांचा तात्काळ बंदोबस्त करण्यात यावा. नगर रोड परिसरामध्ये सर्व शासकीय कार्यालयांच्या व आस्थापनांच्या समोर पार्किंग व नो पार्किंगचे

▶ उर्वरित पान २ वर

## थोडक्यात...

### पत्रकार बाळासाहेब आडागळे व अभिनेत्री प्राची सोनवणे सत्यशोधक पुरस्काराने सन्मानित !



**माजलगाव । प्रतिनिधी**

महाराष्ट्र आधार सेना सामाजिक संघटना व दैनिक महाराष्ट्र आरंभ यांच्या संयुक्त विद्यमानाने यांच्याकडून उल्लेखनिय कार्य केल्याने लोकशाहीर आण्णाभाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त ६ सप्टेबर शनिवार रोजी बीड येथील स्व. यशवंतराव चव्हाण नाट्यगृह या ठिकाणी मा.पालकमंत्री आ. धनंजय मुंडे यांच्या प्रमुख उपस्थितीत व योगेश क्षीरसागर, गयाबाई आवाड, संपादक विजय बंब , संतोष मानूरकर यांच्यासह विविध मान्यवरांच्या हस्ते पत्रकार बाळासाहेब आडागळे व अभिनेत्री प्राची सोनवणे यांना सत्यशोधक पुरस्कार प्रदान करून सन्मानित करण्यात आले. पत्रकार आडागळे यांनी गेली पंधरा वर्षापासून विविध प्रश्नांना वाचा फोडून बातम्या प्रकाशित करून जनसामान्यांना न्याय मिळवून दिला. सामाजिक पत्रकारिता सोबतच विकास व शोध पत्रकारितेत त्यांनी माजलगाव तालुक्यातील अन्याय, अत्याचार, सामाजिक प्रश्नावर वाचा फोडण्याचे काम त्यांनी लिखाणाच्या माध्यमातून केले. तसेच ग्रामीण भागातून व बिकट परिस्थितीतून मात करित अभिनेत्री प्राची सोनवणे हिने प्रेमाचा वनवा या लघु चित्रपटात दमदार भूमिका केल्याने या दोघांच्या कार्याची दखल घेऊन महाराष्ट्र आधार सेना, व दैनिक महाराष्ट्र आरंभ यांच्या संयुक्त विद्यमानाने २०२५ चा सत्यशोधक पुरस्कारासाठी निवड करण्यात आली होती.माजी पालकमंत्री आमदार धनंजय मुंडे यांनी विविध क्षेत्रातील झालेला सन्मान निश्चितच कौतुकास्पद असल्याचे सांगितले. पत्रकार बाळासाहेब आडागळे व अभिनेत्री प्राची सोनवणे यांना मिळालेल्या पुरस्काराबद्दल सर्व क्षेत्रातून कौतुक होत आहे. कार्यक्रमाला योगेश क्षीरसागर, भागवत तावरे, संपादक विजय बम , वसंत मुंडे, गयाबाई आवड, यांच्यासह विविध मान्यवर उपस्थित होते. या कार्यक्रमाचे आयोजन, संपादक दिपक थोरात यांनी केले. तर हा सोहळा भव्यदिव्य होण्यासाठी उद्धव आरे, अशोक वाघमारे, सुनील थोरात, आदीने परिश्रम घेतले.

### सभापती जयदत्त नरवडे यांना पितृशोक

**माजलगाव । प्रतिनिधी**



तालुक्यातील सुलतानपुर (माळेवाडी) चे माजी सरपंच व प्रगतशिल शेतकरी म्हणुन ओळख असलेले सुभाषराव नरवडे यांचे वयाच्या ७५ व्या वर्षी अल्पशा आजाराने दि. ९ सप्टेंबर २०२५ रोजी सकाळी ८.०० वाजता छत्रपती संभाजीनगर येथील हॉस्पिटलमध्ये निधन झाले. सुभाषराव नरवडे हे प्रगतशील शेतकरी तसेच मनमिळावु स्वभावाचे मितभाषी व्यक्तीमत्व असल्याने पंचक्रोषित परिचीत होते. त्यांच्या पार्थीव देहावर सुलतानपुर (माळेवाडी) येथे सायंकाळी पाच वाजता अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात पाच मुले, सुना, नातवंडे, पतवंडे असा परिवार आहे. माजलगाव कृषि उत्पन्न बाजार समितीचे सभापती जयदत्त अण्णा नरवडे यांचे ते वडील होत.

### पत्रकार अविनाश कदम राज्यस्तरीय युवक आधार सेवा रत्न पुरस्काराने सन्मानित



**आष्टी । प्रतिनिधी**

आष्टी तालुका युवा पत्रकार संघाचे अध्यक्ष तथा दै.लोकमत वृत्तपत्रांचे तालुका प्रतिनिधी अविनाश कदम यांच्या सामाजिक कार्याची दखल घेऊन दै युवक आधार या वृत्तपत्राच्या व्दितीय वर्धापन दिनानिमित्त राज्यस्तरीय युवक आधार सेवा रत्न पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.याबद्दल त्यांचे सर्व स्तरातून कौतुक होत असून शुभेच्छांचा वर्षाव होत आहे. आष्टी तालुका युवा पत्रकार संघाचे अध्यक्ष तथा दै.लोकमत तालुका प्रतिनिधी अविनाश कदम हे मागिल अनेक वर्षापासून सामाजिक, शैक्षणिक, धार्मिक, राजकीय, पत्रकारिता क्षेत्रात अग्रेसर असून त्यांच्या कार्याची दखल घेऊन नवी पनवेल येथे रविवार दि ७ सप्टेंबर रोजी दै युवक आधार या वृत्तपत्राच्या व्दितीय वर्धापन दिनानिमित्त राज्यस्तरीय युवक आधार सेवा रत्न पुरस्कार आष्टी तालुका युवा पत्रकार संघाचे अध्यक्ष तथा दै लोकमत / मराठवाडा साथीचे आष्टी तालुका प्रतिनिधी अविनाश कदम यांना न्युज १८ लोकमत सह संपादक विलासजी बडे, अभिनेत्री माधवी जुवेकर, सकाळ समूहाचे मुख्य संपादक डॉ निलेश खरे, उद्योजक डॉ सुधीर कटेकर, बाल कलाकार अर्जूनी सस्ते,अभिनेता सचिन पाडळकर युवक आधारचे संपादक संतोष आमले, महाराष्ट्र संपादक अंजय कापरे,बीड जिल्हा प्रतिनिधी मारूती संत्रे यांच्या हस्ते देऊन सन्मानित करण्यात आले.त्यांचे सर्व स्तरातून अभिनंदन करून शुभेच्छांचा वर्षाव होत आहे.

### सौ.के.एस.के.महाविद्यालयात मराठी विभागाचे अभ्यागत व्याख्यान संपन्न

**बीड । प्रतिनिधी**

सौ.केशरबाई सोनाजीराव क्षीरसागर ऊर्फ काकू कला,विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयात मराठी विभागाच्या वतीने मराठी भाषा कौशल्ये आणि रोजगाराच्या संधी या विषयावरील अभ्यागत व्याख्यान संपन्न झाले. स्वा.सावरकर महाविद्यालय,बीड येथील मराठी विभाग प्रा.डॉ. सोपान सुरवसे यांनी या विषयावर विद्यार्थ्यांना सखोल मार्गदर्शन केले. माहिती तंत्रज्ञानाच्या काळात मराठी भाषा कशी रोजगाराचे साधन होऊ शकते. याविषयी विद्यार्थ्यांना माहिती देताना सुत्रसंचालन,वृत्तनिवेदन,मुलाखत,वृत्तांत लेखन,अर्जलेखन,निवेदनलेखन,सृजनशील लेखन इत्यादी विषय त्यांनी विद्यार्थ्यांना समजावून सांगीतले.